# प्रेस नोट

दिनांक २१/१०/२०१८

## गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसे विक्री करण्यासाठी हैद्राबादहुन आलेल्या गुन्हेगारास पिस्तुलासह शिथाफीने पकडण्यात फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथक यांना यश

दिनांक २१/१०/२०१८ रोजी फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री.महेंद्र पाटील व कर्मचारी हे हद्दीत गुन्हयांना प्रतिबंध घालण्याचे अनुषंगाने पेट्रोलींग करीत असतांना पो.शि.महावीर वलटे यांना त्याचे बातमीदाराने बातमी दिली की, एक इसम रंगाने गोरा अंगात मरून कलरचा गोल गळयाचा फुल बाहयाचा टि शर्ट व निळी जिन्स पँट घातलेला असा क्रांती हॉटेल चौक बुधवार पेठ पुणे येथे थांबला असुन त्याचे कंबरेला पिस्तुल लावलेले दिसत आहे. बातमीप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी असे क्रांती हॉटेल चौक बुधवार पेठ पुणे येथे गेल्यानंतर त्याची खात्री करीत असताना तो पोलीसांना पाहुन पळुन जावु लागल्याने त्यास पाठलाग करून पकडले. त्यावेळी त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव शिवकुमार उर्फ शिवा नरसिंग पाथलावत वय २० वर्षे व्यवसाय काही नाही रा. बोडापंडा थांडा गोविंदपल्ले मेहबुब नगर खोसगी पोलीस स्टेशन हैद्राबाद तेलंगणा व सध्या पुणे फिरस्ता असे सांगितले त्याची अंगझडती घेतली असता त्याचे जिन्स पँटचे पाठीमागील डावे बाजुस आतमध्ये एक गावठी पिस्तुल व खिशात दोन जिवंत काडतुसे असा एकुण ३०,८००/- रू.चा हत्याराचा माल मिळुन आला. त्याने सदरचे गावठी पिस्तुल हे तो कोणालातरी विक्री करण्यासाठी घेवुन आला होता असे प्रथमदर्शी तपासादरम्यान त्याने सांगितले असुन त्याचेवर फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री रविंद्र सेनगावकर,अपर पोलीस आयुक्त दक्षिण विभाग पुणे,मा.श्री.सुहास बावचे,पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ व मा.श्री.प्रदिप आफळे,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. किशोर नावंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संभाजी शिर्के, तपास पथकाचे प्रभारी सपोनि सुनिल गवळी, पोलीस उपनिरीक्षक श्री.महेंद्र पाटील, पोलीस हवालदार बापु खुटवड, केदार आढाव, महावीर वलटे, विनायक शिंदे, अमोल सरडे, हर्षल शिंदे, दिनेश भांदुर्गे, विशाल चौगुले, शंकर कुंभार, अमेय रसाळ, विकास बो-हाडे, मोहन दळवी, गणेश ढगे  आकाश वाल्मीकी, मयुर भोकरे यांचे पथकाने केली.

पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन पुणे